महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१,
दूरध्वनी क्र.०२२- २२६२०२३१/३२, **Email : higherartexam@gmail.com**

क्रमांक :डिओअे/एचएई-२०२०/चार/ 199 दिनांक : 11-3-2020

## परिपत्रक

कला संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या उच्चकला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षा विषयक वेळापत्रक, कार्यालयीन आदेश, परीपत्रके व इत्यादि अनुषंगीक माहिती HIGHER ART EXAM या सदराखाली कला संचालनालयाच्या www.doa.org.in या संकेतस्थळावर वेळोवळी उपलब्ध होतील. तरी संबंधीत कला संस्थांनी याबाबतची नोंद घ्यावी.

(राजीव मिश्रा)
प्र. कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
४) प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला संस्था.

प्रत

माहितीकरीता

१) निरिक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहा. निरिक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर
३) सहा. निरिक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
४) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) निवड नस्ती

महाराष्ट्र शासन
# कला संचालनालय
सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१,
दूरध्वनी क्र.०२२- २२६२०२३१/३२, Email : higherartexam@gmail.com

---

क्रमांक :डिओए/एचएई-२०२०/चार/ 200 दिनांक : 11-3-2020

---

**परीक्षा प्राथम्य / कालमर्यादित /संकेतस्थळामार्फत**

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
४) प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला संस्था.

विषय : **शासकीय उच्चकला परीक्षा- २०२०**
परीक्षेस प्रविष्ट होणा-या विदयार्थ्यांचे हमीपत्र
संदर्भ-कार्यासन क्रमांक दोन यांची दि.६-२-२०२० ची टिपण्णी

कला संचालनालयामार्फत पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणा-या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला संस्थांना कळवण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील परीक्षेस प्रविष्ठ होत असलेल्या प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय विदयार्थ्यांची यादी (संख्या) निरीक्षक ,चित्रकला व शिल्प ,महाराष्ट राज्य, मुंबई तसेच सहा. निरिक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर व सहा. निरिक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून तपासणी करुन घेण्यात आलेली आहे. असे हमी पत्र प्रत्येक संस्थेने परीक्षा नियंत्रकांस देणे बंधनकारक आहे. तथापी विदयार्थी संख्या न तपासता आपण परीक्षेस प्रविष्ठ केलेल्या विदयार्थ्यांच्या निकालाबाबत भविष्यात काही पेचप्रसंग निर्माण झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्याची राहील. याची संबंधीत कलासंस्थांनी नोंद घ्यावी. परीक्षेस प्रविष्ठ होण्यापूर्वी तात्काळ निरीक्षकांकडून परीक्षा प्रवेश यादी-२०२० तपासून घ्यावी व त्याची एक प्रत परीक्षा नियंत्रकांना सादर करावी.

(राजीव मिश्रा)
प्र. कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रत

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता

१.निरिक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२.सहा. निरिक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर
३.सहा. निरिक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
४.कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

कला शाळा आवार, डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१, दुरध्वनी (०२२) २२६२०२३१/३२

Email : higherartexam@gmail.com

क्रमांक:एचएई - २०२० / चार / ३०२ दिनांक: १२/०३/२०२०

प्रति,

१. अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविदयालय, मुंबई.

२. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविदयालय, औरंगाबाद.

३. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविदयालय, नागपूर.

४. प्राचार्य, सर्व संबंधित शासनमान्य अशासकीय कला संस्था.

विषय:- शासकीय उच्चकला परीक्षा - २०२०
परीक्षा साहित्य व प्रश्नपत्रिका वितरण कार्यक्रमाबाबत........

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, सोबत शासकीय उच्चकला परीक्षा २०२० साठी या संचालनालयाकडून शासकीय उच्चकला परीक्षासाठी वितरण करावयाचे साहित्य व प्रश्नपत्रिका घेवून जाण्यासाठी जिल्हानिहाय कालावधी निर्धारीत केला आहे. निर्धारीत केलेल्या दिवशीच संबंधित परीक्षा केंद्र प्रमुखांनी परीक्षा केंद्राचे साहित्य व प्रश्नपत्रिकांची पाकीटे कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई येथून घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

परीक्षा साहित्य/प्रश्नपत्रिकांची पाकीटे घेण्याकरीता केंद्र प्रमुख यांना व्यक्तीश: उपस्थित राहणे अशक्य असल्यास त्यांनी संस्थेतील कार्यरत जबाबदार अध्यापक/ कर्मचारी (गट ड संवर्गातील कर्मचारी वगळून) यांना प्राधिकृत करुन संबंधितांची नमुना स्वाक्षरी प्राधिकार पत्रावर साक्षांकित करावी.

विषयाच्या अनुषंगाने प्राधिकारपत्र व ओळखपत्राच्या सांक्षांकित प्रत सादर केल्याशिवाय साहित्य / प्रश्नपत्रिकांची पाकिटे वितरित केली जाणार नसल्यामुळे साहित्य / प्रश्नपत्रिका स्विकारताना ओळखपत्राच्या साक्षांकित प्रतीसह उपस्थित रहाण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव परीक्षा केंद्रसाठी | दिनांक | वार | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | नागपूर, वर्धा, भंडारा, वाशिम, नांदेड,अमरावती, गोंदीया, चंद्रपूर, यवतमाळ, हिंगोली अकोला, बुलढाणा, जालना, परभणी, जळगांव, नंदुरबार, लातूर, उस्मानाबाद, औरंगाबाद, बीड. | २८/०३/२०२० | शनिवार | सकाळी १०.०० ते सायं ०६.०० |
| २ | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर,नाशिक, धुळे,अहमदनगर, मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग. | २९/०३/२०२० | रविवार | सकाळी १०.०० ते सायं ०६.०० |

परीक्षा साहित्य व प्रश्नपत्रिका वितरण व्यवस्था सुलभतेने पार पाडण्याकरिता परीक्षा केंद्र सुचीतील केंद्र चालकांनी वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे, ही विनंती. जेणेकरून वितरण व्यवस्था सुलभतेणे पार पाडता येईल.

परीक्षा नियंत्रक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

प्रत,

१) भांडारपाल, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

२) निवड नस्ती.

महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

कला शाळा आवार, डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१, दुरध्वनी (०२२) २२६२०२३१/३२

Email : higherartexam@gmail.com

क्रमांक:एचएई - २०२० / चार / 303 दिनांक: १२/०३/२०२०

कालमर्यादित

## परिपत्रक

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित कला संस्थांच्या अधिष्ठाता / प्राचार्य यांना कळविण्यांत येते की, सन २०१९-२०२० या शैक्षणिक सत्रातील ए.टी.डी प्रथम वर्ष परीक्षा दिनांक ३१/०३/२०२० व ए.टि.डि व्दितीय वर्ष परीक्षा दिनांक ०३/०४/२०२० पासून सुरु करण्यांत येत असून ए.टी.डी. अभ्यासक्रमाची परीक्षा दिलेल्या परीक्षा केंद्रावर वेळापत्रकानुसार घेण्यांत येईल. मात्र व्दितीय वर्ष ए.टि.डि या अभ्यासक्रमाच्या विदयार्थ्यांची पपेट वर्क व स्क्रिन प्रिंटींग या प्रात्यक्षिक विषयाची परीक्षा संस्थेतील विषय शिक्षकांनी अभ्यासक्रमानुसार प्रत्येकी ५० गुणांचे प्रश्नसंच तयार करून परीक्षा घ्यावी. हे परीक्षेचे काम व खाली नमूद केलेले कागदपत्रे संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांनी दिनांक ३१/०३/२०२० पूर्वी त्यांना दिलेल्या परीक्षा केंद्र चालकाकडे या कार्यालयातून नियुक्त करण्यांत आलेल्या समालोचक / परीक्षक यांच्याकडे तपासणीसाठी सादर करण्यांत यावे.

| | |
|---|---|
| ए.टी.डी प्रथम वष | १) क्ले जर्नल २) पेपर व कार्ड बोर्ड जर्नल ३) मायक्रो टिचिंग गुणतक्ता ४) प्रोजेक्ट ५) क्लासवर्क गुणतक्ता व पोर्टफोलिओज. |
| ए.टी.डी. व्दितीय वर्ष | पपेट वर्क (बाहूली काम ) उत्तर पत्रिका २) पपेट जर्नल ३) स्क्रिन प्रिंटींग वर्क उत्तर पत्रिका ४) स्क्रिन प्रिंटींग जर्नलस ५) प्रक्टिकल लेसन गुणतक्ता ६) क्लास वर्क गुणतक्ता व पोर्टफोलिओज ७) प्रोजेक्ट |

सादर केलेल्या प्रबंध ( पोर्टफोलिओ ) परीक्षण / समालोचन करून प्राप्त झालेल्या वर्गकामाच्या गुणतक्त्यात योग्य तो बदल करण्याचा अधिकार केंद्रावर नियुक्त करण्यांत आलेल्या समालोचक / परीक्षक यांना राहील याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच ए.टी.डी प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक विषयाची परीक्षा विहित वेळापत्रकानुसार केंद्र प्रमुख सुरु करतील. तथापी या कालावधीत या परीक्षांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार नियुक्त करण्यांत आलेल्या समालोचक / परीक्षक यांना राहतील. प्रात्यक्षिक विषयाच्या उत्तरपत्रिका पेपर समाप्तीनंतर समालोचक / परीक्षक केंद्रचालक याच्या स्वाक्षरीसह सिलबंद करून एकत्रित मूल्यमापन केंद्रावर दिलेल्या तारखेस पाठवावीत.

तसेच अधिष्ठाता / प्राचार्यांना असेही कळविण्यांत येते की, ए.टी.डी प्रथम वर्ष व व्दितीय वर्षाच्या परीक्षा संपल्यानंतर परीक्षणासाठी सादर केलेले जर्नल, प्रोजक्ट, इ. दस्तऐवज (डॉक्युमेंटस) केंद्रातून परत घेवून जावेत व परीक्षा निकाल जाहीर होईपर्यंत त्यांच्या महाविदयालयात ठेवण्यांत यावेत.

परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रति,

१. अधिष्ठाता, सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
४. प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला संस्था.

प्रत,
निवड नस्ती.

महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

कला शाळा आवार, डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१, दुरध्वनी (०२२) २२६२०२३१/३२

Email : higherartexam@gmail.com

क्रमांक:एचएई - २०२० / चार / 304 दिनांक:१२/०३/२०२०

तात्काळ/महत्वाचे

प्रति,

१. अधिष्ठाता, सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई
२. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
४. प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला संस्था.

विषय:- शासकीय उच्चकला परीक्षा २०२०
केंद्र चालकांच्या (कंडक्टर) नियुक्ती व पायाभूत परीक्षा ३D विषयाचे मुल्यमापनाबाबत...

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या परीक्षा केंद्रावर घेण्यांत येणा-या शासकीय उच्चकला परीक्षा सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी केंद्र चालक म्हणून आपली नियुक्ती करण्यांत आली आहे. काही अडचणीमुळे केंद्रचालक पदाचा पदभार स्विकारणे शक्य न झाल्यास आपल्या महाविदयालयातील अध्यापकीय वर्गातून अनुभवी व तज्ञ अध्यापकाची केंद्रचालक म्हणून नियुक्ती करावी व तसे केल्याचे या कार्यालयास कळवावे. केंद्रचालकांना पालन करावयाच्या सुचनांच्या मार्गदर्शिकेची प्रत सोबत जोडली आहे. तरी त्यातील सूचनां लक्षात घेवून परीक्षांचे आयोजन व्यवस्थितपणे करण्याची जबाबदारी सर्वस्वी आपल्यावर आहे], याची नोंद घ्यावी.

२. आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या केंद्रावर घेण्यांत येणा-या पायाभूत वर्ग परीक्षेतील ३D या विषयाच्या पेपरचे मूल्यमापन आपल्या महाविदयालयातील विषय शिक्षक व आपल्या केंद्रावर समाविष्ठ होणा-या महाविदयालयातील विषय शिक्षकांस बोलावून आपल्या नियंत्रणाखाली करून घेण्यांत यावे. तसेच परीक्षार्थीचे आसन क्रमांक व नावानुसार गुणतक्ता तयार करून त्या गुणतक्त्यात परीक्षक व केंद्रचालकांची स्वाक्षरी घेवून त्याची एक प्रत सिलबंद करून इतर उत्तर पत्रिका संबंधित परीक्षा केंद्राच्या मुल्यमापन केंद्रावर पाठविण्यांत यावी. तसेच दुसरी प्रत संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर होईपर्यंत आपल्या कस्टडीत सुरक्षित ठेवण्यांत यावी. तसेच मुलभूत वर्गातील वर्गकामाच्या गुणाच्या कामाचा तक्ता सोबत पाठविण्यांत यावा. प्रस्तुत प्रकरणी कोणताही विलंब अथवा गैरप्रकार होणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घेण्यांत यावी. या संदर्भात भविष्यात काही पेचप्रसंग उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

कला शाळा आवार, डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१, दुरध्वनी (०२२) २२६२०२३१/३२

Email : higherartexam@gmail.com

क्रमांक:एचएई - २०२० / चार /३०५ दिनांक: १२/०३/२०२०

परीक्षा प्राथम्य/संकेतस्थळामार्फत

प्रति,

१. अधिष्ठाता, सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई
२. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
४. प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला संस्था.

विषय:- शासकीय उच्चकला परीक्षा - २०२०
ग्रेड परीक्षा उत्तीर्ण नसतांना मुलभूत व ए.टी.डी. प्रथम वर्षास तात्पूरता प्रवेश दिलेल्या विदयार्थ्यांचा निकाल कळविणेबाबत.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, या संचालनालयामार्फत घेण्यांत आलेल्या शासकीय रेखाकला परीक्षा ( एलीमेंटरी / इंटरमिजिएट ड्रॉईग ग्रेड परीक्षा ) - २०१९ चा निकाल घोषीत करण्यांत आला असून शासकीय उच्च कला परीक्षा - २०२० साठी आपल्या कला संस्थेतील ज्या विदयार्थ्यांना फौंडेशन / ए.टी.डी. प्रथम वर्षास इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा उत्तीर्ण करण्यांच्या अटीवर तात्पुरता प्रवेश दिलेला आहे, अशा विदयार्थ्यांचा निकाल खालील तक्त्यांत भरून या कार्यालयास तात्काळ पाठविण्यांत यावा.

| अ.क्र. | अभ्यासक्रम फौंडेशन / ए.टी.डी. | विदयार्थ्यांचे नांव | इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | केंद्र क्रमांक | परीक्षा केंद्राचे नांव | मिळालेली ग्रेड | शेरा उत्तीर्ण / अनुत्तीर्ण |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

ज्या विदयार्थ्यांना इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीवर तात्पुरता प्रवेश दिलेला असेल व सदर विदयार्थी ग्रेड परीक्षेत अनुत्तीर्ण झाले असल्यास प्रचलित प्रवेश नियमानुसार त्या विदयार्थ्यांचा प्रवेश तात्काळ आपल्या स्तरावर रदद करण्यांत यावा.

इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा अनुत्तीर्ण असतांना विदयार्थी परीक्षेस प्रविष्ट केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विदयार्थ्यांचा निकाल कोणतीही पुर्वसूचना न देता रदद करण्यांत येईल. तसेच वरीलबाबतीत आपल्या कोणत्याही विनंती अर्जाची दखल घेण्यांत येणार नाही. विदयार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस तसेच या प्रकरणानुषंगाने भविष्यात काही पेच प्रसंग उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, याची संबधीत प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.